MARUTI SUZUKI

# MARUTI SUZUKI COMPILED MEDIA REPORT

18 Feb, 2025

## Enter title of report

### Total Mention 12

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 6 | 2 | 4 | N/A | N/A |

| Tv | Business | English | Hindi | |
|---|---|---|---|---|
| N/A | N/A | N/A | N/A | N/A |

| Online |
|---|
| N/A |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | The Economic Times | test1 test | Hyderabad | 5,2 |
| 2. | The Economic Times | fbfgf | Kochi | 7 |
| 3. | The Hindu | test | Delhi | 2 |
| 4. | The Hindu | test3 | Delhi | 1 |
| 5. | The Echo of India | test2 | Kolkata | 3 |
| 6. | The Echo of India | test | Kolkata | 2,4 |

The Economic Times • Hyderabad • 08 Mar, 2025

# test1 test

| Page no | Language | Article Dimension | Supplement | Position | AVE | Circulation |
|---|---|---|---|---|---|---|
| 5,2 | English | 112 | ET Panache | left,right | 0 | 75.22K |





The Economic Times • Kochi • 10 Mar, 2025

fbfgf

| Page no | Language | Article Dimension | Supplement | Position | AVE | Circulation |
|---|---|---|---|---|---|---|
| 7 | English | 722 | ET Panache | left | 0 | 22.84K |

# धर्म • समाज • संस्था

दिव्य मराठी नाशिक. बुधवार, ७ फेब्रुवारी २०२४

१० व ११ रोजी उत्सव • मराठी, तामीळ, इंग्रजी, कोकणी भाषेतून १४ वेळा मिस्सा

# बाल येशू यात्रेत यंदा देशभरातील २.५० लाख भाविक घेणार दर्शन

प्रतिनिधी | नाशिकरोड

नाशिकरोड येथे १० आणि ११ फेब्रुवारीला होणाऱ्या बाल येशू यात्रेच्या वेळी यंदा देशभरातून सुमारे २.५० लाख भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सेंट झेवियर्स चर्च प्रशासनाने मिस्साची (प्रार्थना) संख्या १ ने वाढवून १४ केली आहे. त्यामुळे सर्वच भाविकांना मिस्सामध्ये सहभाग घेता येईल. मराठी, इंग्रजी, कोकणी आणि तामिळ अशा चार भाषांमध्ये मिस्सा होणार आहे. भाविकांना राहण्यासाठी मैदानावर सुविधा करण्यात आली आहे.

संपूर्ण भारतात बाल येशूची ३ मंदिरे असून त्यापैकी नाशिकरोड येथील मंदिराला विशेष महत्त्व असल्याने या ठिकाणी ख्रिश्चन बांधव दर्शनाला सर्वाधिक पसंती देत असतात. १० आणि ११ फेब्रुवारीला होत असलेल्या यात्रेसाठी सेंट झेवियर्स चर्चमध्ये जोरदार तयारी सुरू आहे. मंगळवारी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस उपायुक्त मोनिका राऊत, सहायक पोलिस आयुक्त डॉ. सचिन बारी यांनी परिसराची पाहणी करून पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याचे आदेश दिले आहेत. यात्रेसाठी ११ दिवस महत्त्वाचे असून १ फेब्रुवारीपासून चर्चमध्ये नोव्हेना साजरा करण्यात येत आहे. दररोज इंग्रजीतून ३, मराठीतून २ तर कोकणी भाषेतून १ मिस्सा आणि नोव्हेनाची भक्ती केली जात आहे. गेल्या वर्षापासून कोरोनाची भीती कमी होत चालल्याने १३ वेळेस मिस्सा घेण्यात आली होती. यंदा गर्दी अधिक राहणार असल्याचे लक्षात घेऊन १४ वेळेस मिस्सा होणार आहे. १० फेब्रुवारीस १४ वेळेस , तर ११ फेब्रुवारीला ७ वेळेस मिस्सा होईल. या यात्रेसाठी महाराष्ट्रासह गोवा, मुंबई, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, गुजरातमधील तसेच इतर ठिकाणचेही ख्रिश्चन बांधव दर्शनासाठी येतात.

## नाशिकरोडच्या सेंट झेवियर्स चर्चमध्ये तयारीला वेग


### वाहतुकीचे नियोजन

बाल येशू यात्रेनिमित्त देशभरातून ख्रिश्चन बांधव सेंट झेवियर्स चर्चमध्ये दर्शनासाठी येत असतात. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी मंगळवारी वाहतुकीचे नियोजन करण्यासंदर्भात चर्चचे धर्मगुरू आणि इतरांशी चर्चा केली तसेच काही सूचना केल्या. भाविकांना कुठलीही अडचण येऊ नये अशी तयारी करण्यात येत आहे.



बाल येशू

### 3 पैकी 1 मंदिर शहरात



*भारतात बाल येशूची नाशिक, मंगलोर आणि वसई या तीनच शहरांत मंदिरे आहेत. मात्र, नाशिक येथील मंदिरात केलेले नवस पूर्ण होत असल्याची दृढ श्रद्धा असल्याने येथे देश-विदेशातून ख्रिश्चन बांधव दर्शनासाठी येतात.*

**- एरोल फर्नांडिस,** धर्मगुरू

The Hindu • Delhi • 25 Feb, 2025

test

| Page no | Language | Article Dimension | Supplement | Position | AVE | Circulation |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | English | 339 | Metro Plus | Top Right | 0 | 682.81K |

BID TO RAISE FUNDS AMID STRONG CREDIT DEMAND

# Banks Hike Deposit Rates to Woo Savers

## SBI has increased rate by 20 bps, HDFC 35 bps and Axis 15 bps on FDs of less than 2 yrs

**DEPOSIT RATES (IN %)**

| | |
|---|---|
| State Bank of India | 2.90-6.30 |
| ICICI Bank | 2.75-5.75 |
| HDFC Bank | 2.75-6.50 |
| Kotak Mahindra Bank | 2.50-6.56 |
| Punjab National Bank | 3-6 |



Saloni.Shukla@timesgroup.com

**Mumbai:** Banks are increasing deposit rates to attract savers, as they seek to raise funds to meet growing credit demand despite higher lending rates, and with the new spike in Covid-19 infections having little impact on economic activities.

State Bank of India, the country's largest lender, last week increased the retail rate by 20 basis points, or 0.2 percentage point, for fixed deposits of less than two years.

Private lenders HDFC Bank and Axis raised rates by 35 and 15 basis points, respectively, for similar tenors.

IDFC First Bank and Kotak Mahindra Bank have been the most aggressive. IDFC First raised its savings deposit rate by a percentage point to 6% in May, offering 6% on deposits of over Rs 10 lakh, besides hiking the term rates.

Kotak Mahindra increased its fixed deposit rates this month by as much as half a percentage point.

Liquidity Surplus Since June 2019 ▸▸ 8

The Hindu • Delhi • 08 Mar, 2025

# test3


| Page no | Language | Article Dimension | Supplement | Position | AVE | Circulation |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | English | 9491 | Metro Plus Weekend | left | 0 | 682.81K |



The Echo of India • Kolkata • 08 Mar, 2025

# test2

| Page no | Language | Article Dimension | Supplement | Position | AVE | Circulation |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | English | 1198 | N/A | right | 0 | 120.06K |



The Echo of India • Kolkata • 10 Mar, 2025

test

| Page no | Language | Article Dimension | Supplement | Position | AVE | Circulation |
|---|---|---|---|---|---|---|
| 2,4 | English | 2353 | N/A | left,right | 0 | 120.06K |

धर्म • समाज • संस्था

दिव्य मराठी नाशिक, बुधवार, ७ फेब्रुवारी २०२४

१० व ११ रोजी उत्सव • मराठी, तामीळ, इंग्रजी, कोकणी भाषेतून १४ वेळा मिस्सा

# बाल येशू यात्रेत यंदा देशभरातील २.५० लाख भाविक घेणार दर्शन

प्रतिनिधी | नाशिकरोड

नाशिकरोड येथे १० आणि ११ फेब्रुवारीला होणाऱ्या बाल येशू यात्रेच्या वेळी यंदा देशभरातून सुमारे २.५० लाख भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सेंट झेवियर्स चर्च प्रशासनाने मिस्साची (प्रार्थना) संख्या १ ने वाढवून १४ केली आहे. त्यामुळे सर्वच भाविकांना मिस्सामध्ये सहभाग घेता येईल. मराठी, इंग्रजी, कोकणी आणि तामिळ अशा चार भाषांमध्ये मिस्सा होणार आहे. भाविकांना राहण्यासाठी मैदानावर सुविधा करण्यात आली आहे.

संपूर्ण भारतात बाल येशूची ३ मंदिरे असून त्यापैकी नाशिकरोड येथील मंदिराला विशेष महत्त्व असल्याने या ठिकाणी ख्रिश्चन बांधव दर्शनाला सर्वाधिक पसंती देत असतात. १० आणि ११ फेब्रुवारीला होत असलेल्या यात्रेसाठी सेंट झेवियर्स चर्चमध्ये जोरदार तयारी सुरू आहे. मंगळवारी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस उपायुक्त मोनिका राऊत, सहायक पोलिस आयुक्त डॉ. सचिन बारी यांनी परिसराची पाहणी करून पोलिस कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याचे आदेश दिले आहेत. यात्रेसाठी ११ दिवस महत्त्वाचे असून १ फेब्रुवारीपासून चर्चमध्ये नोव्हेना साजरा करण्यात येत आहे. दररोज इंग्रजीतून ३, मराठीतून २ तर कोकणी भाषेतून १ मिस्सा आणि नोव्हेनाची भक्ती केली जात आहे. गेल्या वर्षापासून कोरोनाची भीती कमी होत चालल्याने १३ वेळेस मिस्सा घेण्यात आली होती. यंदा गर्दी अधिक राहणार असल्याचे लक्षात घेऊन १४ वेळेस मिस्सा होणार आहे. १० फेब्रुवारीस १४ वेळेस , तर ११ फेब्रुवारीला ७ वेळेस मिस्सा होईल. या यात्रेसाठी महाराष्ट्रासह गोवा, मुंबई, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, गुजरातमधील तसेच इतर ठिकाणचेही ख्रिश्चन बांधव दर्शनासाठी येतात.

## नाशिकरोडच्या सेंट झेवियर्स चर्चमध्ये तयारीला वेग


### वाहतुकीचे नियोजन

बाल येशू यात्रेनिमित्त देशभरातून ख्रिश्चन बांधव सेंट झेवियर्स चर्चमध्ये दर्शनासाठी येत असतात. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी मंगळवारी वाहतुकीचे नियोजन करण्यासंदर्भात चर्चचे धर्मगुरू आणि इतरांशी चर्चा केली तसेच काही सूचना केल्या. भाविकांना कुठलीही अडचण येऊ नये अशी तयारी करण्यात येत आहे.



बाल येशू

### 3 पैकी 1 मंदिर शहरात



*भारतात बाल येशूची नाशिक, मंगलोर आणि वसई या तीनच शहरांत मंदिरे आहेत. मात्र, नाशिक येथील मंदिरात केलेले नवस पूर्ण होत असल्याची दृढ श्रद्धा असल्याने येथे देश-विदेशातून ख्रिश्चन बांधव दर्शनासाठी येतात.*

**- एरोल फर्नांडिस,** धर्मगुरू



बेलवलकर ज्वेलर्स
३५ वर्षांची परंपरा अविरत सेवा
शुद्ध सोने मनोवेधक डिझाईन्स
खात्रीशीर दर
कल्प कॉर्नर, कांबळी गल्ली, बाजारपेठ कणकवली
मो. ९४२२४३४५०१, फोन : (०२३६७) २३२८९२
प्रोप्रा. दिपक रा. बेलवलकर
सोने (२२ कॅरेट) दर : ४८,४५०/-
चांदी दर : ७०,०००/-



शब्दांना सत्याची धार

# प्रहार

नोंदणी क्रमांक : एमएएचएमएआर/२००८/३३७८७ ■ सिंधुदुर्ग ■ वर्ष १७ ■ अंक २४५ ■ पाने ८ ■ पाच रुपये

www.prahaar.in | रविवार, २५ जुलै २०२१ | epaper.prahaar.in




### केंद्रीयमंत्री नारायण राणे आज कोकणात

केंद्रीय सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस हे रविवारी रायगड आणि कोकणचा दौरा करणार आहेत. महाडमधील दुर्घटनाग्रस्त तळीये गावाला भेट दिल्यानंतर ते रत्नागिरीत खेड आणि चिपळूणमध्ये पाहणी करणार आहेत.

## तळीये गावाच्या पाहणीचा दिखावा

### ४५ मृतदेह बाहेर : दुर्घटनेनंतर दोन दिवसांनी मुख्यमंत्र्यांची भेट



▸ मुंबई (प्रतिनिधी) :

अतिवृष्टीमुळे तळीये गावावर गुरुवारी सायंकाळी दरड कोसळली.ही दुर्घटना घडल्यानंतर जवळपास दोन दिवसांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या दुर्घटनाग्रस्त तळीये गावाला भेट दिली आणि सर्वांचे पुनर्वसन करण्याचे थातुरमातुर आश्वासन दिले.

अतिवृष्टीने तळीये गावात होत्याचे नव्हते करून टाकले. गुरुवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास तळीये गावावर दरड कोसळली. यात ३५पैकी ३२ घरे दगड मातीच्या ढिगाऱ्याने गिळंकृत केली. गावात अद्याप बचावकार्य सुरूच आहे. ४५पेक्षा अधिक माणसांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून, (पान २ वर)

### सैन्यातील जवानाचे अख्खे कुटुंब संपले

महाड - मागील तीन दिवसांपासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील अनेक भागांमध्ये पाण्याने धोक्याची पातळी ओलांडून सारा भाग पाण्याखाली गेला आहे. रायगड, रत्नागिरी, चिपळूण आणि महाड या भागांमध्ये प्रलय आल्यासारखी स्थिती आहे. रायगड आणि साताऱ्यात दरडी कोसळून आतापर्यंत अनेकांचा जीव गेला आहे. महाड तालुक्यातील तळीये गावात ३५ घरांवर दरड कोसळून कुटुंबच्या कुटुंब उद्धवस्त झाले आहेत. या घटनेत आतापर्यंत ४५ जणांना आपला जीव गमवावा लागला. या घटनेत भारतीय सैन्यातील जवानाचं अख्ख कुटुंबच संपल आहे. जवान अमोल कोंडाळकर यांच्यासोबत नियतीने क्रूर थट्टा केली असून त्यांचे आई-बाबा, बहीण आणि बायको या दुर्घटनेत दगावली आहे.अमोल कोंडाळकर हे वरिष्ठ पदाच्या ट्रेनिंगसाठी पुण्यात आहेत. त्यामुळे या दुर्दैवी घटनेतून बचावले आहेत. गेल्याच वर्षी अमोल यांचं लग्न झालं होतं. मात्र कोसळलेल्या दरडीने अमोल यांना एकट करून टाकले आहे.

### म्हाडा बांधणार घरे

महाड येथील तळीये हे गावच दरडीखाली नष्ट झाले आहे. परंतु आता म्हाडाच्या माध्यमातून या ठिकाणी पुन्हा नव्याने गाव वसविण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी ट्विटरवरून दिली आहे. त्यानुसार जेवढी घरे यात जमीनदोस्त झाली आहे, तेवढी पक्की घरे पुन्हा उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या ठिकाणी नेमकी किती घरे होती, (पान २ वर)

## मुसळधार पाऊस आणि आपत्ती असतानाही निलेश राणे चिपळूणमध्ये दाखल

- पूरग्रस्तांना मदतीचे साहित्य सुपूर्द
- एसपी, सीईओ यांच्याकडून घेतला पुराचा आढावा



▸ चिपळूण

मुसळधार पाऊस, कोसळणाऱ्या दरडी, बंद झालेले विविध मार्ग, संपर्कादरम्यान येणाऱ्या अडचणी या सगळ्या गोष्टींचा सामना करत केवळ चिपळूणवासियांना मदत पोहोचविण्यासाठी भाजपा प्रदेश सचिव, माजी खासदार निलेश राणे शुक्रवारी मुंबईहून चिपळूण येथे दाखल झाले. सोबत आणलेली मदत त्यांनी संबंधितांकडे सुपुर्द केली तर डिएसपी आणि सीईओ यांच्याकडून परिस्थितीचा आढावा सुद्धा घेतला.

गुरूवारी चिपळूण शहर आणि परिसरात महापूर आल्याने हजारो माणसे विविध ठिकाणी अडकून राहिली होती. चिपळूणवासिवांनी २४ तासांपेक्षाही अधिक काळ अन्न पाण्याविना मदतीची वाट पाहत पाण्यात काढली. ही परिस्थिती विविध माध्यमातून भाजपा प्रदेश सचिव निलेश राणे यांच्यापर्यंत पोहोचत होती.अशावेळी चिपळूणवासियांना मदतीची गरज आहे. केवळ याच भावनेतून निलेश राणे शुक्रवारी सकाळीच लवकर मुंबईतून चिपळूणला निघाले. त्यांनी आपल्या सोबत आवश्यक ते सामान भरून घेतले.

मात्र, मुंबई ते चिपळूण हा त्यांचा प्रवास आज नेहमीसारखा झाला नाही. निसर्गाने दोन दिवसापासूनच आपले रौद्र रूप दाखवायला सुरुवात केली होती. त्यामुळे चिपळूणला येईपर्यंत जवळपास सर्वच मार्गांवर अनेक अडचणी होत्या. काही ठिकाणी दरडी कोसळत होत्या, काही ठिकाणी पाणी भरले होते. रस्ते बंद होते.

संपर्क तुटला होता. परंतु याही परिस्थितीचा सामना करत निलेश राणे शुक्रवारी चिपळूण येथे पोहोचले. त्यांनी चिपळुणच्या नागरिकांसाठी आणलेल्या जीवनावश्यक वस्तू पाणी, बिस्किटे, चिवडा, (पान २ वर)

### चिपळूणवासियांच्या संकटात निलेश राणे यांचा मदतीचा हात

#### पूरग्रस्त भागांना दिली भेट; स्थानिकांच्या व्यथा घेतल्या जाणून; जीवनावश्यक वस्तूंची मदत

▸ रत्नागिरी (प्रतिनिधी)

चिपळूण पूरग्रस्तांना पुन्हा जिद्दीने उभं करण्यासाठी भाजपचे प्रदेश सचिव, माजी खासदार निलेश राणे गेले दोन दिवस तेथे असून चिपळूणवासियांना आवश्यक वस्तू वाटप करतानाच त्यांच्याशी संवाद साधत निलेश राणे चिपळूणवासियांची दुःखे जाणून घेत आहेत.

माजी खासदार निलेश राणे हे नैसर्गिक परिस्थिती अनुकूल नसतानाही शुक्रवारी सकाळी मुंबईतून निघून चिपळूणला पोहोचले. सोबत मदतीचे आणलेले साहित्य तिथल्या नागरिकांना देऊन त्यांना दिलासा देण्याचं प्रयत्न केला. शुक्रवारी संध्याकाळी (पान २ वर)

## लहान मुलांचे लसीकरण सप्टेंबरपासून!

### एम्सकडून संकेत

▸ नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

कोरोनाची दुसरी लाट ओसरली असली तरी कोरोनाचा धोका कायम आहे. आता कोरोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता वर्तविण्यात येत असून त्यात लहान मुलांवर सर्वाधिक प्रभाव पडेल, असे सांगितले जाते. याच अनुषंगाने गेल्या काही दिवसांपासून भारत बायोटेकच्या कोव्हॅक्सिन लसीचे लहान मुलांवर क्लिनिकल ट्रायल सुरू आहे. याबाबत सप्टेंबरपर्यंत निकाल येण्याची शक्यता आहे. त्यामुळे लहान मुलांना सप्टेंबर महिन्यापासून लस देण्याची शक्यता आहे.

कोरोनाची साखळी तोडण्यासाठी मुलांचे लसीकरण करणे गरजेचे (पान २ वर)

## मंगळूर एक्सप्रेसवर दरड कोसळली

### मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकली रेल्वे गाडी

▸ मुंबई/पणजी

गेल्या तीन चार दिवसांपासून मुसळधार पावसाने महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांना जोरदार तडाखा दिला आहे. हा मुसळधार पाऊस आणि पुराचा सर्वाधिक फटका कोकण विभागाला बसला आहे. कोकणातील विविध गावांत भूस्खलन होऊन झालेल्या दुर्घटनेत शेकडो जणांचा मृत्यू झाला आहे. तर या भूस्खलनाचा रेल्वेलाही फटका बसला आहे. गोव्यामध्ये मंगळुरूकडून मुंबईकडे येणाऱ्या एका ट्रेनवरच दरड कोसळली असून, मातीच्या ढिगाऱ्याखाली ही गाडी सापडली आहे.

शुक्रवारी कर्नाटकमधील मंगळुरू येथून मुंबईकडे येणारी ही गाडी अपघाताची शिकार झाली आहे. या घटनेचा व्हिडीओ आता समोर आला आहे.



प्रसारमाध्यमांमध्ये येत असलेल्या वृत्तानुसार रेल्वे रुळावरून उतरण्याची ही घटना दुधसागर-सोनोलिम विभागात घडली आहे. मिळत असलेल्या माहितीमध्ये अपघातग्रस्त ट्रेनची ओळख ०११३४ मंगळुरू जंक्शन-सीएसएमटी एक्स्प्रेसच्या रूपात झाली आहे. विशेष बाब म्हणजे चिपळूण येथे आलेल्या पुरामुळे या रेल्वेच्या मार्गात बदल करून ती मडगाव-मिरजमार्गे वळवण्यात आली होती. त्यातल्या त्यात दिलासादायक बाब म्हणजे या अपघातात कुठल्याही प्रकारची जीवितहानी (पान २ वर)

## अभिमानास्पद : भारताच्या पहिल्या वहिल्या ऑलम्पिक पदकाला 'मालवणचं कनेक्शन'

### मीराबाई चानू यांचा फिजिओ आलाप जावडेकर सिंधुदुर्ग महाविद्यालयाच्या माजी प्राचार्यांचा नातू

▸ कुणाल मांजरेकर (मालवण)

टोकियोमध्ये सुरू असलेल्या ऑलिंपिक स्पर्धेत भारताला दुसऱ्याच दिवशी पहिलं वहिलं पदक मिळालं आहे. मिराबाई चानू यांनी (पान २ वर)



## ज्येष्ठ कवी सतीश काळसेकर यांचे निधन

▸ मुंबई



ज्येष्ठ कवी, संपादक आणि सामाजिक कार्यकर्ते सतीश काळसेकर यांचे निधन घरीच झोपेत निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. ह्यवाचणाऱ्याची रोजनिशीह्न लिहून त्यांनी वाचकांशी थेट संवाद साधला होता.

महाराष्ट्रातल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातल्या काळसे गावात (पान २ वर)

## गांजा विक्रीचे सिंधुदुर्गात रॅकेट

### ३ किलो २७८ ग्रॅम गांजा हस्तगत : दोघे युवक ताब्यात : मुख्य आरोपी फरार

▸ कुडाळ (प्रतिनिधी)

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने आकेरी येथे गांजाची वाहतूक करणाऱ्या दोन युवकांना पकडून कुडाळ पोलिसांच्या ताब्यात दिले त्यानंतर या गांजा प्रकरणाचा तपास कुडाळ पोलिसांनी हाती घेऊन या प्रकरणातील मुख्य आरोपी पर्यंत पोलीस पोचले मात्र हा आरोपी पळाला दरम्यान त्याच्यासोबत काम करणारा सावंतवाडी येथील अतुल उमेश गवस (वय २३) हा युवक ताब्यात मिळाला. त्याच्या जवळून सुमारे ३ किलो २७८ ग्रॅम एवढा गांजा हस्तगत केला असून याची



अतुल गवस याला कुडाळ न्यायालयात हजर करताना पोलीस अधिकारी व कर्मचारी व पोलिसांनी हस्तगत केलेल्या गांजा

किंमत सुमारे ९८ हजार ४००रु. आहे.त्याला पुन्हा न्यायालयात हजर केले असता रविवार २५ जुलै पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे पोलिसांच्या या कारवाईमुळे गांजा विक्री करणारे मोठे रॅकेट उघड होऊ शकते.

स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पथक कुडाळ तालुक्यामध्ये गुरुवार २२ जुलै रोजी गस्त घालत असताना गोपनीय माहितीच्या आधारे सावंतवाडी ते वेंगुर्ला या मार्गावरून गांजा वाहतूक होणार असल्याचे पोलिसांना समजले ही वाहतूक मोटरसायकलवरून करण्यात येणार असल्याचे (पान २ वर)

## पद वाचवण्यासाठी मुख्यमंत्री काळी जादू करत असल्याची चर्चा

▸ मुंबई (प्रतिनिधी)

स्वतःचे मुख्यमंत्रीपद वाचवण्यासाठी काळी जादू आणि पूजा मुख्यमंत्री स्वतःच्या घरी करत असतात असे आम्ही ऐकतो, असा हल्लाबोल आ. नितेश राणे यांनी केला आहे.

राज्यात कोकणासह पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे हाहाकार उडाला आहे. या पार्श्वभूमीवर आ. नितेश राणे यांनी ट्विटरवरून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. स्वतःचे मुख्यमंत्रीपद वाचवण्यासाठी काळी जादू आणि पूजा मुख्यमंत्री स्वतःच्या घरी करत असतात असे आम्ही ऐकतो.. तशीच आता एकदा महाराष्ट्राला शांत करण्यासाठी महापूजा करावी, जेणेकरून २८ नोव्हेंबर २०१९ला लागलेली

### आमदार नितेश राणे यांचा हल्लाबोल



पणवती एकदाचीच काय ती दूर होईल, असे ट्वीट आमदार नितेश राणे यांनी केले आहे.

**मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांवर खुनाचा गुन्हा हवा**

कोकणासह राज्यात विविध ठिकाणी मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. या नैसर्गिक संकटांच्या पार्श्वभूमीवर भाजप आमदार नितेश राणे यांनी थेट मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि इतर मंत्र्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी तीव्र प्रतिक्रिया आमदार नितेश राणे यांनी दिली आहे.

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, या संकटात सापडलेल्यांना सरकारकडून उशिराने आणि संथगतीने मदत मिळाल्याने अनेक लोकांचा मृत्यू झाला आहे. आम्ही घटनास्थळी दाखल झालो होतो, पण लोकांना कित्येक तास सरकारकडून कोणतीही मदत मिळाली नाही. पुरातून बाहेर काढण्यासाठी बोटी पाठवण्यात आल्या नाहीत. अधिकारी नेटवर्कमध्ये नव्हते. त्यामुळे (पान २ वर)

## इन्सुलीत ३२ लाखांची गोवा बनावटीची दारु जप्त

### उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई

▸ बांदा (प्रतिनिधी) :

गोव्याहून कोल्हापूरच्या दिशेने ट्रकमधून होणाऱ्या बेकायदा दारू वाहतुकीवर राज्य उत्पादन शुल्कच्या इन्सुली तपासणी नाक्यावर कारवाई करत तब्बल ३२ लाख ४० हजार रुपये किमतीच्या गोवा बनावटीची दारु जप्त केली आहे. ६०० बॉक्समध्ये तब्बल (पान २ वर)



इन्सुली उत्पादन शुल्क नाका येथे पकडण्यात आलेल्या मुद्देमाल व संशयितासह एक्साइजचे अधिकारी. (छाया : प्रविण परब

## जामसंडे भटवाडी येथे घरावर कोसळली दरड

- मालपे येथे मातीचे घर जमीनदोस्त
- कोर्ले धालवली येथील शेतीमध्ये पुराचे पाणी

▸ देवगड (प्रतिनिधी)

गेले १० ते १५ दिवस अक्षरशः झोडपून काढणाऱ्या पावसाने शनिवारी विसावा घेतला मात्र अतीवृष्टीचा तडाखा पोंभुर्ले, कोर्ले, धालवली या गावांना मोठ्या प्रमाणात बसला असून जामसंडे भटवाडी येथे घरावर दरड कोसळली. मालपे येथील मातीचे घर जमीनदोस्त झाले.



अतिवृष्टीने मालपे मुस्लीमवाडी येथील नजिम मुकादम यांचे कोसळलेले मातीचे घर



अतिवृष्टीने जामसंडे भटवाडी येथील विजय लक्ष्मण चिंदरकर यांच्या घरावर मातीची दरड कोसळून झालेले नुकसान(छाया:वैभव केळकर)

गेले दहा ते पंधरा दिवस झोडपून काढल्यानंतर पावसाने विश्रांती घेतली तरीही संततधार पावसामुळे जामसंडे भटवाडी येथील विजय लक्ष्मण चिंदरकर यांच्या घरावर मातीची दरड कोसळल्याने घराचे मागील बाजुने सुमारे ५५ हजाराचे घराचे नुकसान झाले.कोर्ले धालवली मालपे गावातील पुर ओसरला मात्र शेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मालपे मुस्लीमवाडी येथील नजिम गुलाम मोहमद मुकादम यांच्या मातीचे घर जमीनदोस्त झाले.